जिल्हा नियोजन समितीच्या
कामकाजाबाबत.

**महाराष्ट्र शासन**

नियोजन विभाग

शासन निर्णय क्रमांकः डिएपी-१०१४/प्र.क्र.२९५/का.१४८१

मंत्रालय, मुंबई. ४०० ०३२,

तारीख: १७ डिसेंबर, २०१४.

वाचा:-

१) **महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम, १९९८**

२) **महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (सभा घेणे) नियम, १९९९**

३) **शासन निर्णय क्रमांकः नियोजन विभाग, क्रमांक:- जिवायो-१००७/प्र.क्र.३९/का.१४४४, दि.१६ फेब्रुवारी, २००८.**

४) **शासन परिपत्रक क्रमांकः नियोजन विभाग, क्रमांक:- डिएपी-१०११/सं.क्र.४७०/का.१४८१, दि.१८जून, २०१२**

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम, १९९८ मधील कलम-१० मध्ये जिल्हा नियोजन समितीची कामे विहित केली आहेत. त्यानुसार जिल्हा नियोजन समितीने कामकाज पार पाडणे अपेक्षित आहे. जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था व अन्य कार्यान्वयीन यंत्रणांनी तयार केलेल्या जिल्हा वार्षिक योजना विचारात घेऊन, संपूर्ण जिल्हयाच्या विकास योजनेचा एकत्रित मसुदा तयार करून, तो राज्य शासनास सादर करण्याच्या उद्देशाने जिल्हा नियोजन समितीची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम, १९९८ मधील कलम-७ च्या तरतुदींच्या अनुषंगाने जिल्हा वार्षिक योजनेचा निधी अर्थसंकल्पीत करणे, वितरीत करणे व या निधीतील कामांना प्रशासकीय मान्यता देणेबाबतची सुधारित कार्यपध्दती शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक:- जिवायो-१००७/प्र.क्र.३९/का.१४४४, दि.१६ फेब्रुवारी, २००८ अन्वये विहीत करण्यात आली आहे. तथापि, जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत विविध जिल्ह्यांमध्ये जिल्हा नियोजन समितीच्या ठराविक सदस्यांनी/ व्यक्तींनी सूचविलेल्या कामांना प्रशासकीय मान्यता देऊन निधी वितरीत केला जातो, असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. तसेच जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये कामांना मंजूरी देण्याचे सर्व अधिकार मा.पालकमंत्री तथा अध्यक्ष, जिल्हा नियोजन समिती यांना देण्याचा ठराव संमत करून घेण्यात येतो व त्यानंतर मा.पालकमंत्री तथा अध्यक्ष, जिल्हा नियोजन समिती यांच्या मान्यतेने कामांना मंजूरी देण्यात येते, असेही निदर्शनास आले आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.१६९८/२०११ (श्री. चरणसिंह वाघमारे विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर) या प्रकरणी सन्माननीय उच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयात जिल्हा नियोजन समिती, भंडारा यांनी केलेल्या कार्यवाही संदर्भात तीव्र नाराजी व्यक्त करुन जिल्हा नियोजन समितीच्या कामकाजाबाबत स्पष्ट निर्देशही दिले आहेत. कायदेशीर तरतूदींच्या विरूध्द जाऊन व अधिकार कक्षेबाहेर जाऊन जिल्हा

नियोजन समितीचे कामकाज होऊ लागल्यास त्याचे पर्यावसन न्यायालयात दावे दाखल होण्यात होतो. या पार्श्वभूमीवर, असे प्रकार टाळण्यासाठी संदर्भ क्रमांक (४) येथील शासन परिपत्रक, नियोजन विभाग, क्रमांक:- डिएपी-१०११/सं.क्र.४७०/का.१४८१, दि.१८जून, २०१२ अन्वये सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तथापि, मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.४८३१/२०१३ (श्री.सुधीर सुर्यवंशी विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर) प्रकरणी सदर सूचनांचे तंतोतंत पालन अद्याप होत नसल्याचे शासनाच्या निदर्शानास आले आहे. त्यामुळे या अनुषंगाने सविस्तर आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय:-

संदर्भ क्र.(४) येथील शासन परिपत्रक, नियोजन विभाग, क्रमांक:- डिएपी-१०११/सं.क्र.४७०/ का.१४८१, दि.१८जून, २०१२ याद्वारे रद्द करण्यात येत असून या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

(१) महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम, १९९८ मधील कलम-१० अन्वये विहित केल्यानुसार जिल्हा नियोजन समितीचे कामकाज नियमानुसार चालविण्यात यावे, असे शासनाचे आदेश आहेत.

(२) तसेच उक्त अधिनियमातील कलम-७ अनुसार जिल्हा नियोजन समितीने कामकाज पार पाडताना अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत संदर्भ क्र. (३) येथील शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक: जिवायो-१००७/प्र.क्र.३९/का.१४४४, दि.१६ फेब्रुवारी, २००८ अन्वये सुधारित कार्यपध्दती विहित केली आहे. सदर कार्यपध्दतीनूसार जिल्हा नियोजन समितीने कामकाज पार पाडणे आवश्यक तथा बंधनकारक आहे.

(३) जिल्हा वार्षिक योजनेच्या आराखडयातील योजनांसह त्याअंतर्गतच्या कामांना मान्यता देण्याचे अंतिम अधिकार जिल्हा नियोजन समितीला आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत सदर संस्थांनी प्रस्तावीत केलेल्या कामांच्या आराखडयास जिल्हा नियोजन समितीकडून मंजूर नियतव्ययाच्या मर्यादेत प्राथम्यानुसार कामांची निवड करून त्या कामांना निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

(४) तसेच जिल्ह्याची निकड व गरज लक्षात घेता, स्थानिक स्वराज्य संस्थेशी संबंधित असलेले एखादे काम/कामे जिल्हा नियोजन समितीला.प्राथम्याने घ्यावयाचे असल्यास, अशा कामांबाबत जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सचिव म्हणजेच जिल्हाधिकारी यांनी संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेकडे तसा प्रस्ताव पाठवून त्यास संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेची संमती घेणे बंधनकारक राहील. कोणत्याही परिस्थितीत सदर कार्यवाही न करता जिल्हा नियोजन समितीकडून परस्पर अशी कामे आराखडयात समाविष्ट करता येणार नाहीत.

(५) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक:- जिवायो-१००७/प्र.क्र.३९/का.१४४४, दि.१६ फेब्रुवारी, २००८ मधील परिच्छेद क्र. ३.२ अनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांकडील (जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, नगरपंचायत) योजनां/कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थांना राहतील. मात्र त्यांनी प्रशासकिय मान्यता देताना जिल्हा नियोजन

समितीकडून उपलब्ध निधी विचारात घेऊन दिडपट मर्यादेच्या बाहेर प्रशासकिय मान्यता देऊ नये. तसेच उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ३.२ मधील प्रकरणे सोडून जिल्हा वार्षिक योजनेतील इतर कामांना प्रशासकिय मान्यता देण्याचे प्रशासकिय विभागांचे व त्यांच्या क्षेत्रीय यंत्रणांचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

(६) स्थानिक स्वराज्य संस्थेकडील कामांबाबत सदर संस्थेने "ना-हरकत प्रमाणपत्र" दिल्यास अशा कामाची राज्यस्तरीय कार्यान्वयीन यंत्रणेकडून अंमलबजावणी करून घेता येईल. मात्र, कोणत्याही परिस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या "ना-हरकत" प्रमाणपत्राशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील कामांची राज्यस्तरीय यंत्रणेकडून अंमलबजावणी करता येणार नाही.

(७) महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (सभा घेणे) नियम, १९९९ मध्ये विहीत केल्याप्रमाणे जिल्हा नियोजन समितीच्या सभांचे कामकाज पार पाडावे असे शासनाचे आदेश आहेत. सदर सूचनांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्यात येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(८) जिल्हा नियोजन समितीच्या बैठकांचे इतिवृत्त पृष्ठांकित करावे व बांधणी केलेल्या रजिस्टर मध्ये ठेवण्यात यावे.

(९) वरील नमूद कार्यपध्दतीप्रमाणे सर्व जिल्हा नियोजन समित्यांनी त्यांचे कामकाज घालून दिलेल्या नियमांनुसारच चालवावे. विधीग्राह्य नसलेले कामकाज तसेच विहीत कार्यपध्दतीचे उल्लंघन करुन, अधिकार कक्षेबाहेर जाऊन कोणतेही कामकाज होणार नाही याची सर्वस्वी दक्षता जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव यांनी घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४१२१७११४७१३४५१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

K P Bakshi

Digitally signed by K P Bakshi
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, postalCode=400032, st=MAHARASHTRA, cn=K P Bakshi
Date: 2014.12.24 11:49:28 +05'30'

(के.पी. बक्षी)
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.